दयानंद कला महाविद्यालय, लातूर

वर्ग

बी.ए. द्वितीय वर्ष सत्र तिसरे

मराठी विभाग

वाङ्मय प्रकाराचा अभ्यास नाटक शोभायात्रा

(मेजर)

विषय कोर्स कोड-HMARCT 1202

प्रा. डॉ. अर्चना अनिल गंगावणे

फलश्रुती (Cos)

१. विद्यार्थ्यांना नाटक या वाङ्मय प्रकाराची ओळख होईल.

२ .नाटक आणि अन्य वाङ्मय प्रकार यांच्यातील साम्य भेदविद्यार्थ्यांच्या लक्षात येतील.

३.संहिता आणि प्रयोग या नाटकाच्या दोन्ही अंगाचा विद्यार्थ्यांना अभ्यास होईल.

४.विद्यार्थ्यांमध्ये नाटकाच्या रस स्वादाची अभिरुची निर्माण होईल.

अभ्यासक्रम

१.नाटक संकल्पना आणि स्वरूप

१.१ नाटक म्हणजे काय

१.२ नाटकाचे स्वरूप

१.३.नाटकाचे प्रकार

१.४.नाट्य सादरीकरणाचे घटक शोभायात्रा

२.मराठी नाटकाला लेखकाचे योगदान

२.१नाटकाचे संविधानिक किंवा आशय

२.२.आशयाचे महत्त्व

३. पात्र चित्रण

३.१व्यक्तिरेखा

३.२ समाज दर्शन

३.३.संघर्ष

४.मूल्यविष्कार

४.१जीवनमूल्य

४.२ सामाजिक मूल्य

४.३ सांस्कृतिक मूल्य

४.४ नाटकाची लेखनशैली

५ संवाद

५.१ नाटकाची भाषा

५.२ उपरोध

५.३ नाटकाचे वेगळेपण

नाटकाची संकल्पना

संकल्पना म्हणजे काय ? संकल्पना म्हणजे एक संक्षिप्त सारांश असतो जो नाटकाविषयी एखाद्या विषयाबद्दल वस्तू विषयी अनेक घटने विषयी आपल्या मनात असणारी सर्वसाधारण कल्पना आहे किंवा एक विचार होय.

नाटक हे एक दृकश्राव्य आहे. नाटक या संज्ञेचा मूळ अर्थ असा आहे . नाटक म्हणजे काय नाटक म्हणजे माणसाच्या आंतरबाह्य क्रिया प्रतिक्रियांचे दर्शन घडवणारा आकृतीबंध होय. नाटकातूनच मानवी अस्तित्वाचं या विश्वरचनेशी काय नातं आहे ते कळतं . "समूहाने समूहासमोर सादर केलेली कला म्हणजेच नाटक .

नाटक म्हणजे सादरीकरणाचा एक प्रकार ज्यामध्ये संवाद आणि कृतीच्या माध्यमातून संघर्ष भावना आणि अनुभवाचे चित्रण केले जाते.नाटकासाठी एक कथा आवश्यक असते ज्यात घटना संघर्ष आणि पात्रांचे संबंध दर्शविले जातात.

कथेचे घटक यामध्ये कथा, पात्र, संवाद , भाषाशैली, नाट्यशैली, दिग्दर्शन ,नैपथ्य, संगीत,नाटकाचा उद्देश, प्रेक्षक आणि पार्श्वभूमी या घटकांचा समावेश असतो.

नाटकाचे प्रकार

भारतीय संस्कृतीत भरतमुनींना जोमान आहे . तोच मान ग्रीक संस्कृतीत ॲरिस्टॉटलला आहे ग्रीक म्हणजे अरिस्टॉटल याने सुमारे 15000 वर्षांपूर्वी Poetics नावाचा ग्रंथ लिहिला आणि नाट्यविषयक स्वरूपाविषयी चर्चा केली. नाटकाचे दोन प्रकार सांगितले आहेत ज्यामध्ये पहिला प्रकार आहे सुखान्तिका किंवा सुखात्मिका. दुसरा प्रकार आहे शौकात्मिका किंवा शोकांतिका.

मानवी जीवन हे सुख आणि दुःख यांनी बनलेले असल्यामुळे नाटकात जीवनाविषयी अनुकृती असलेल्यामुळे त्या दोन्ही भावना त्यात अभिजीत होतील हेच स्वाभाविक आहे. लेखक रा.स.वाळींबे लिखित मराठी नाट्य समीक्षा या ग्रंथात त्यांनी असं म्हटलं आहे, की दुःख पर्यावासही नाटके अवश्य लिहिली गेली पाहिजेत.हा मुद्दा पटवून देताना ते एका अनामिक टीका कराच विवेचन देतात ते पुढील प्रमाणे म्हणतात नाटक म्हणजे सृष्टी केव्हाचे जात अनुकरण करून लेखनाद्वारे संवाद रूपाने मानव संसाराचे रूप वास्तविकपणे दाखवले जाते असा ग्रंथ म्हणजेच नाटक.

शोकांतिका :-शोकांतिका हा माणसाच्या अटळ दुःखाचे चित्रण करणारा असा नाट्यप्रकार आहे त्यामुळे प्रकृती गंभीर असते शोकांतिका म्हणजे ज्या नाट्यकृतीचा अंत दुःखद आहे मृत्यू विरोह असे शेवट

सामान्य सह शोकांतिकेचे असतात शोकांतिका आणि शौकातमिका या थोडा फरक दिसून येतो. आपण जेव्हा शौकात्मिका म्हणतो तेव्हा नाटकाचा शेवट शोकच असावा असा आग्रह नसून नाटकाचा एकंदर परिणाम शोककारक असेल म्हणजे नाटकाचा प्राणच जर शोकमय असेल तर ती शोकात मी का ठरते शोकात्मक नाटकाचे स्वरूप व्यापक आहे त्यामध्ये जीवनात सुखापेक्षा दुःख जास्त आहेत विश्वाचा व्यापार एक अगम्य अशी शक्ती चालू असते तिला केव्हा कोणी दैव म्हणतो तर कोणी नियती अशी ही शक्ती मानवावर नियंत्रण करते काही मुख्य देन नियतीमुळे निर्माण होते असे म्हणतात तर पंधराव्या शतकामध्ये शेक्सपियरने शोकांतिका ही स्वतःच्या स्वभावामुळे निर्माण होते असे म्हटले आहे शेक्सपियरच्या नंतरच्या काळात समाज माणसाचे जमातील स्थान समाजातील स्थान परिस्थिती यामुळे माणसाची झालेली शोकांतिका याला नाटक करणे अधिक महत्त्व दिला आहे.

सुखात्मिका :-

नाटकाचा दुसरा प्रकार म्हणजे सुखात्मिका किंवा सुखांतिका हा नाट्यप्रकार म्हणून विनोदाने प्रमुख हेतू घेऊन खेळकर शैलीत लिहिलेल्या प्रवृत्तीने बराच हलकाफुलका असतो कधी कधी विषय गंभीर असला तरी त्याची हाताळणे हास्य उत्पादित होते मात्र हास्य प्रती आनंदाने हसण्याचे प्रकार पुष्कळ आहेत तरी ही केवळ हसवणे हा सुखांतिकेचा उपदेश नाही तर सुखात्मिकेत माणसाच्या सुखद दर्शनाला जास्त महत्त्व असते वा. ल .कुलकर्णी त्यांनी असं म्हटलं आहे की जेव्हा व्यक्तीच्या आचार विचारात विसंगतीची जाणीव अशा प्रकारची असते तिच्या प्रकाशामध्ये मनुष्य स्वभावातील काही चिरंतन विसंगती तेवढ्या व्यक्त होतात म्हणजे माणसा माणसातील मूलभूत दुर्बल्य लक्षात आल्याने माणूस स्वतःच हसू लागतो. त्यामुळे सुखात्मिका मनावरील ताण हलका करते. सुखात्मिकाचे अनेक प्रकार मानले जातात.आचार विडंबन सुखात्मिका कारस्थान प्रधान सुखात्मिका प्रसंगनिष्ठ सुखात्मीका आणि स्वभाव प्रधान सुखात्मिका.

आचार्य अत्रे म्हणतात,विनोद हे जीवनाकडे पाहण्याचे एक विशाल दृष्टी आहे व्यंग म्हणजेच अपेक्षाभंग म्हणून माणसाची सर्व शारीरिक आणि मानसिक वेंगे ही हास्य विषयक होऊन बसली आहेत विनोद हे अहिंसेसारखं एक मोठं नाजूक पण प्रभावी अस सशस्त्र आहे किंबहुना ती वाङ्मयातील अहिंसाच आहे. (विनोदाचे तत्त्वज्ञान आचार्य अत्रे विनोद गाथा)

शोकांतिका आणि सुखात्मिका यातील फरक स्पष्ट करा.

१. शोकांतिका चिरंतर लिहिणारे असतात त्यामध्ये चिरंतर टिकणारे नसतात तर सुखात्मीका चिरंतन टिकून राहू शकत नाही कारण त्यामध्ये आपल्या भावनांना फारसं आवाहन केलेले नसते.

2. शोकात मी का मनुष्याच्या श्वास्वत भावभावनांना हात घालतात तर सुखांतिकाचं तसं होत नाही त्यात वरवरचा विनोद दाखवतात.

3. शोकांतिकाचे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत रूपांतर भाषांतर करणे सोपे असते पण विनोदाची भाषांतर करणे कठीण असल्याने सुखांतिकेचे भाषांतर करण्यात अडचणी येतात.

नाटकाचा तिसरा प्रकार

प्रहसनात्मक :- हा नाट्यप्रकार सुखात्मिकेप्रमाणेच आहे परंतु काही बाबतीत वेगळा आहे संगीत नाटक या अर्थाने मेलो ड्रामा हे नाव पुढे आलेला आहे मेलो ड्रामाचा शेवट सामान्यपणे आनंदी असा होतो त्यामुळे प्रमुख पात्र बाबतीत घडलेल्या प्रसंगाने मत हादरले तरीही शेवट सत्याचा होतो तसेच या नाटकातील संघर्ष साधा सरळ आणि ठसठशीत स्वरूपाचा असतो मेलो ड्रामाच्या सर्व भर सित्यशोभक घटनांवर असतो व्यक्ती चित्रण या प्रकारांमध्ये दुय्यम मानल्यामुळे घटनांच्या निर्मितीसाठी योगायोगाचा सर्रास उपयोग हा केला जातो मेलो ड्रामाचा विशेष घटक सैलसर स्वभाव चित्रण योगायोग पूर्ण भडक प्रसंग तात्पुरती भीती हे असतात.

नाटकाचा चौथा प्रकार :-

अतिरंजक (फार्स) :फार्स या प्रकाराचा सुखात मी का या प्रकारातून उगम झाला आहे प्रसंगनिष्ठ सुखात्मिका आणि फार्स या प्रकारात साम्य आहे या नाट्य प्रकाराचा प्रमुख हेतू कुठल्याही प्रकारे हसवणे फार्समुळे मनोरंजन होते खऱ्या अर्थाने करमणूक होते कोणत्याही प्रकारचा ताण प्रेक्षकांना नसतो इतर नाट्य प्रकाराच्या संहितेला जेवढी जेवढी दिनवंत तेवढीच फारच आहे संहितेला असते असा हा नाट्य प्रकार करमणूक प्रधान असून केवळ टाइमपास याच्यासाठी विचारात घेतला जातो आणि म्हणूनच फारसाची लोकप्रियता इतर नाट्यप्रकाराच्या मानाने अधिक आहे.

शोभायात्रा -

शफाअत खान यांचे योगदान :-

मराठी नाट्यसृष्टीतील एक सिद्ध रूप नाटककार दिग्दर्शक आणि लेखक लेखनशैली राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवावर थेट उपरोधक आणि तिरकस शैली भाष्य करणे हे त्यांच्या लेखकाचे लेखनाचे मुख्य वैशिष्ट्य आहे शफाअत खान यांनी मराठी रंगभूमीला अधिक गाजलेली नाटके लिहिलेली आहेत. मुंबईचे कावळे ,किस्से, पॉपकॉर्न आणि ड्राय डे समाजात आणि राजकारणात

घडणाऱ्या घडामोडींकडे ओढ्या डोळ्यांनी पाहण्याची दृष्टीने हा त्यांचा उद्देश असतो. शोभायात्रा नाटकाचे अनेक भाषेत प्रयोग केले गेले आहेत हिंदी, इंग्रजी, गुजराती, बंगाली.

आधुनिक मराठी प्रायोगिक नाटककार नाट्यदिग्दर्शक आणि नाट्य प्रशिक्षक त्यांचा जन्म २१ नोव्हेंबर 1952 साली मध्यमवर्गीय कुटुंबात सावंतवाडी सिंधुदुर्ग जिल्हा येथे झाला. ते मुंबई विद्यापीठातील विज्ञान विषयातून पदवीत्तर झाले. मुंबईचे कावळे 1976 हे शहर अतखान्यांचे पहिलं गाजलेले नाटक. हे मुक्तशैलीतील नाटक प्रखर सामाजिक राजकीय विधान करणार आहे शाफा अदखान यांच्या प्रायोगिक रंगभूमीवरील कार्याची आणि राख्या लेखनाचे दखल घेऊन मुंबई विद्यापीठाने त्यांची अकादमी ऑफ थेटर आर्ट्स यांना टीवि भागात अध्यापक म्हणून नियुक्ती केली. सुमारे बारा वर्षे त्यांनी अध्यापन केलं त्यानंतर त्याच विभागांमध्ये प्रभावी संचालक म्हणून हि त्यांनी काम पाहिलं. तसेच त्यांनी राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्ली येथे आयोजित झालेल्या कार्यशाळेत प्रशिक्षण ही दिलं. शफाअतखान यांना अनेक मानसन्मान मिळवले. त्यांचे महाराष्ट्र राज्य पुरस्कार, नाट्य दर्पण पुरस्कार, महाराष्ट्र कलानिकेतन पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन ग्रंथ पुरस्कार, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा अनंत काणेकर पुरस्कार, नाट्य लेखनासाठीचा संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार इत्यादींचा समावेश असून २०१७ मध्ये त्यांनी त्यांना मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान प्राप्त झाला. शफाअतखान यांच्या नाट्यकृती प्रहसन सदृश्य आहेत असे काही समीक्षकाचं म्हणणं आहे. कारण त्यांची लेखन शैली तिरकस पण भोसरी विदूषकी पद्धतीची आहे. तिच्यावर भारतीय लोककला लोककथा नित्य कथा यांचा प्रभाव जाणवतो.

नाटकाचे महत्त्व :-

शोभायात्रा हे शफाअत खान यांचे महत्त्वाचे नाटक असून या नाटकांमधून समाजातील धार्मिकता जातीयता राजकारण सामाजिक विसंगती आणि मानसा माणसांमधील संबंध यांचा चिकित्सक विचार मांडला आहे. समाज सामाजिक वास्तवाचे चित्र नाटकांमध्ये समाजातील विविध स्तरामधून माणसांची जीवन आणि त्यांच्या समस्या वास्तवादी पद्धतीने मांडलेल्या आहेत. धर्माधतेवर भाष्य धर्माच्या नावाखाली निर्माण होणारे गैरसमज संघर्ष आणि तणाव यावर लेखकाने प्रश्न उपस्थित केलेले आहेत. समाजात जात धर्मापेक्षा माणुसकी महत्त्वाची आहे हा विचार नाटकातून प्रभावीपणे व्यक्त होतो हा त्यांचा जातीय आणि धार्मिक याचा सलोख्याचा संदेश आहे.

सामान्य जनतेच्या भावना आणि धार्मिक श्रद्धाचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी करणाऱ्या प्रवृत्तीवर नाटक हे भाष्य करते नाटकाचा मानवतावादी दृष्टीकोन म्हणजेच नाटकाचा केंद्रबिंदू माणूस आहे. द्वेष आणि भेदभाव आणि संघर्षापेक्षा प्रेम सहकार्य आणि माणुसकी यांना महत्त्व

दिल आहे. नाटकातील प्रश्न आजच्या समाजाशी संबंधित वाटतात त्यामुळे शोभायात्रा हे केवळ मनोरंजन करणारे नाटक न राहता सामाजिक जाणीव निर्माण करणारे नाटक ठरते.

शोभायात्रा नाटकातील व्यक्तिरेखा :-

प्रस्तावना :-नाटकातील व्यक्तिरेखा समाजातील विविध प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात प्रत्येक पात्राच्या माध्यमातून लेखकाने सामाजिक वास्तवाचा एखादा पैलू स्पष्ट केला आहे.

व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये :-

१. व्यक्तिरेखा वास्तववादी आहेत.

2. पात्रांच्या संवादातून त्यांचे विचार आणि मानसिकता स्पष्ट होते.

३. काही पात्रे धार्मिक आणि सामाजिक प्रतिनिधित्व करतात.

४. काहीपात्रे विवेक वादी आणि मानवतावादी विचारांचे प्रतिनिधित्व करतात.

५. राजकीय आणि सामाजिक स्वार्थी प्रवृत्तीच दिग्दर्शन होते.

६. पात्रांमधील संघर्षातून नाटकाचा मुख्य आशय पुढे येतो.

निष्कर्ष :-शोभायात्रा हें केवळ नाटक नसून सामाजिक वास्तवाचे भान देणारे आणि प्रबोधन करणारी नाटक आहे शफरत खान यांनी व्यक्तिरेखांच्या माध्यमातून धर्म जात राजकारण आणि सामाजिक संबंध यांचा चिकित्सक विचार मांडला आहे. त्यामुळे मानवतावाद विवेकवाद आणि सामाजिक सलोखा ही या नाटकाची प्रमुख वैशिष्ट्ये मानता येतात.

शोभायात्रा नाटकाची लेखनशैली :-शपातखान यांच्या शोभायात्रा नाटकाची लेखनशैली ही वास्तववादी विनोदी आणि प्रबोधनात्मक स्वरूपाची आहे समाजातील विविध प्रश्नांना नाट्यमय रूप देताना लेखकाने सहज प्रभावी आणि बोलीभाषेतील संवादाचा वापर हा केला आहे.

शोभायात्रा नाटकामधील सामाजिक मूल्य : - शफातखान यांच्या शोभायात्रा या नाटकावरून समाज जीवनातून विविध मूल्य आणि सामाजिक विसंगती प्रभावीपणे मांडल्या गेले आहेत नाटकाचा उद्देश केवळ मनोरंजन नसून समाज जागृती आणि प्रबोधन हा आहे माणूस हा कोणत्याही जातधर्म किंवा पंथापेक्षा महत्त्वाचा आहे माणुसकी परस्पर अंतर आणि सहकार्य यांना नाटकातून महत्व दिलं जातं हे आहे त्यांचं मानवतावादी मूल्य.

कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारू नये तिचा तर्क आणि बुद्धीच्या कसोटीवर विचार करावा हा महत्त्वाचा संदेश विवेकवादी मूल्य देत .

जात, धर्म, उच्च, नीच अशा अशा भेदांमुळे समाजात दुरावा निर्माण होतो त्यामुळे समानता आणि सामाजिक न्याय आवश्यक आहे हे आहे सामाजिक समतेचे मूल्य.वेगवेगळ्या जाती-धर्माच्या लोकांनी परस्परांमध्ये एकोपा सहनशीलता आणि बंधुभाव राखावा असा विचार नाटकात व्यक्त होतो ते बंधूभावाचे मूल्य.

अंधश्रद्धा कर्मकांड आणि अविवेकी समजूती यापेक्षा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचार महत्त्वाचा आहे धर्माच्या नावावर भेद निर्माण करणे ऐवजी सर्व धर्माबद्दल आदर आणि सहनशीलता ठेवण्याचा विचार महत्त्वाचा ठरतो .

निष्कर्ष :-शोभायात्रा नाटकामधील सामाजिक मूल्यांचा केंद्रबिंदू माणूस आणि माणुसकी हा आहे समता बंधुता विवेकवाद वैज्ञानिक दृष्टिकोन सहनशीलता आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांच्या आधारे समाजाने पुढे जावे असा प्रबोधनात्मक संदेश शपथ खाण देतात त्यामुळे हे नाटक सामाजिक मूल्याची जाणीव करून देणारे महत्त्वाचे नाटक ठरते.

शोभायात्राची वैशिष्ट्ये :

१.सामाजिक आशियाचे नाटक

२.प्रबोधनात्मक स्वरूप

3.अंधश्रद्धा वर टीका

४.विवेक वादाचा पुरस्कार

५.मानवी मूल्यांचा स्वीकार

६.सामाजिक विसंगतीचे चित्रण

७. राजकीय आणि सामाजिक स्वार्थस्वार्थावर उपरोध

८..संवाद प्रधान शैली

9. विनोद हा उपरोधाचा प्रभावी वापर

10. वास्तववादी मांडणी

11. बोली भाषेचा वापर

12. प्रतिकात्मक शीर्षक

13. विचार प्रवर्तक आशय

14. सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा

निष्कर्ष :शोभायात्रा हे केवळ मिरवणुकीचे चित्रण करणारे नाटक नसून समाजातील बाह्य धार्मिकता अंधश्रद्धा दिखावा विसंगती आणि स्वार्थ यांचं चिकित्सक परीक्षण करणारे प्रबोधनात्मक नाटक आहे शफाऊत खान यांनी विनोद उपरोध संवाद वास्तववादी प्रसंग आणि प्रतिकात्मक यांच्या साह्याने गंभीर सामाजिक प्रश्न मांडले आहेत त्यावरील शोभायात्रा मनोरंजन प्रेक्षकाला विचार करायला लावणारे आणि सामाजिक जाणीव निर्माण करणारे हे नाटक ठरते शोभायात्रा ये हसवता हसवता सामाजिक वास्तवाचे भान देणारे अंधश्रद्धा आणि त्याच्यावर प्रश्न उपस्थित करणारी आणि विवेकवादी विचारांशी जाणीव करून देणारं प्रबोधनात्मक नाटक आहे.

नाटकाची लेखन शैली :-

शोभायात्रा हे शोभात खान यांचे महत्त्वाचं सामाजिक आशियाचे नाटक आहे या नाटकामधून समाजातील धार्मिकता अंधश्रद्धा जातीयता राजकीय स्वार्थ सामाजिक विसंगती आणि सामाजिक माणसाची नाटक कांची लेखन शैली व पुरवठा प्रबोधनात्मक प्रबोधनात्मक आहे.

उपरोधित्व लेखन शैली :नाटेकरांनी विसंगती दाखवताना उपरोधक आणि विनोदाचा प्रवाही वापर केला आहे गंभीर सामाजिक प्रश्न ही काही वेळा विनोदी पद्धतीने मांडली जातात. त्यामुळे प्रेक्षकांचे मनोरंजन होते आणि त्याचवेळी विचार करायला भाग पाडले जाते.

वास्तववादी शैली:- नाटकातील प्रसंग पात्रे आणि वास्तववादी समाजाची जवळीक आहे सामान्य माणसाची विचार श्रद्धा आणि सामाजिक मूल्ये याच वास्तव चित्रण केले जातं.

संवाद प्रधान शैली:- शोभायात्रा या नाटकामध्ये संवादांना विशेष महत्त्व आहे पात्राच्या संवादातून त्यांचे विचार स्वभाव आणि सामाजिक परिस्थिती स्पष्ट होते संवाद सहज आणि प्रसंगांमधून आहेत. बोली भाषेचा वापर :-नाटकारांनी पात्रांचा सामाजिक स्थळानुसार बोलीभाषा आणि सहज भाषा वापरली आहे त्यामुळे पात्रे अधिक जिवंत आणि नैसर्गिक वाटतात.

व्यंगात्मक शैली:- समाजातील चुकीच्या रूढी अंधश्रद्धा अनुकरण आणि स्वार्थीकरण यामुळे व्यंगात्मक प्रवाह केला आहे हा स्वतः हसवता समाजातील दोषावर भाष्य केले आहे हे या शैलीचं वैशिष्ट्य आहे.

प्रतिकात्मकता:- शोभायात्रा हे शीर्षकच प्रतिकात्मक आहे शोभा यात्रेच्या निमित्ताने समाजातील विविध प्रवृत्ती श्रद्धा अंधश्रद्धा राजकीय सामाजिक वास्तव यांचे दर्शन घडते .

प्रबोधनात्मक शैली:- नाटकांचा उद्देश केवळ समाजातील दोष दाखवणे नसून प्रेक्षकांना विचारशील आणि वैदिक बनवणे आहे त्यामुळे नाटकाला प्रबोधनात्मक स्वरूप प्राप्त होते. एकूणच शोभायात्रेचे वास्तववादी संवाद प्रधान उपरोधी व्यंगात्मक विनोदी आणि प्रबोधनात्मक आहेत शफाअत खान ने मनोरंजनाच्या माध्यमातून सामाजिक वास्तवावर भाष्य केले आहे त्यामुळे हे नाटक सामाजिक जाणीव निर्माण करणारे आणि विचारप्रवृत्त करणारे आहे.

नाटकाची वेगळेपण :- शोभायात्रा नाटकाची वेगळी पण हे पुढील मुद्द्यांद्वारे आपल्याला स्पष्ट करता येईल.

समाजवास्तवाचे प्रभाविचित्रण

धर्मादातेवर भाष्य

उपरोध आणि विनोदाचा वापर

शोभायात्रा हे प्रतीक

सामाजिक सामाजिक ऐक्याचा संदेश

समकालीन विषयांची मांडणी

पात्रांमधून विचारांची मांडणी

मनोरंजन आणि प्रबोधन यांचा समन्वय

निष्कर्ष:- शोभायात्राचे खरे वेगळेपण म्हणजे मनोरंजनाच्या माध्यमातून सामाजिक वास्तवात धर्मादाता संघर्ष आणि माणुसकी यांचा विचार प्रेक्षकांसमोर प्रभावीपणे मांडते त्यामुळे हे नाटक केवळ मनोरंजन करणारे न राहता प्रबोधन करणाऱ्या आणि विचारप्रवृत्त करणारे नाटक ठरते.

शोभायात्रा नाटकातील जीवनमूल्य :-शपथखान यांच्या शोभायात्रा नाटकांमधून जीवन समाज जीवनातील विविध प्रश्न मानवी संबंध आणि सामाजिक विसंगती यांचे प्रभावितरण होते नाटकांमधून पुढील जीवनमूल्य अधोरेखित होतात.

1) मानवता
2) सामाजिक एकता
3) सहिष्णता
4) बंधुभाव
5) विवेकशीलता
6) सामाजिक जबाबदारी
7) सत्याची जाणीव

निष्कर्ष:- शोभायात्रा हे केवळ मनोरंजन नाटक नसून मानवी मूल्य सामाजिक एकता समता श्रेष्ठ आणि विवेकशीलता यांचा पुरस्कार करणारे प्रबोधनात्मक नाटक आहे समाजातील विसंगती दाखवा माणसाने अधिक संवेदनशील विवेकी आणि जबाबदार बनावे हा नाटकाचा जीवन मूल्यात्मक संदेश आहे .

शोभायात्रा नाटकाचे पात्र चित्रण :

शफाअत खान यांच्या शोभायात्रा या नाटकात सामाजिक वास्तव मानवी स्वभाव धार्मिक सामाजिक मानसिकता आणि बदलत्या मूल्यांचा वेध घेतला आहे नाटकातील व्यक्तिरेखा केवळ कथानक पुढील नेण्यासाठी नसून त्या समाजातील विविध प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात त्यामुळे या पात्रांना सामाजिक आणि वैचारिक संदर्भ प्राप्त होतो.

नाटकातील व्यक्तिरेखांचे स्वरूप :-नाटकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा ही सामाजिक परिस्थितीशी संघर्ष करणारे आहे तिच्या विचारांमधून समाजातील विसंगती आणि बदलांची गरज व्यक्त होते ती केवळ व्यक्ती न राहता सामान्य माणसांचा प्रतिनिधित्व करते धार्मिक मानसिकतेचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे म्हणजेच या पात्रांच्या वर्तनातून धर्म परंपरा आणि रूढी यांचा समाजवर असलेला प्रभाव दिसतो काही पात्रे परंपरांचा समर्थन करतात तर काही पात्रेतील विसंगतीवर प्रश्न उपस्थित करतात त्यामुळे नाटकात परंपरा विरुद्ध विवेक असा संघर्ष निर्माण होतो.सामान्य माणसाची व्यक्तिरेखा म्हणजेच सामान्य माणूस हा नाटकातील महत्त्वाचा घटक आहे सामाजिक परिस्थितीचा त्याच्यावर होणारा परिणाम त्याच्या वर्तनातून दिसतो स्वतःचे मत असतानाही सामाजिक दबावामुळे तो अनेकदा संभ्रमित होतो. स्त्री व्यक्तिरेखा म्हणजे नाटकातील स्त्री व्यक्तिरेखांमधून स्त्रीचा

सामाजिक स्थान तिच्या समस्या आणि तिच्या भाव विश्वाचे दर्शन होतं श्री ही केवळ दुय्यम भूमिका न राहता सामाजिक वास्तव समजून घेण्याचं माध्यम बनते.विरोधी विचारांची पातळी यामध्ये नाटकामुळे रुढी अंधानुकरण आणि सामाजिक विसंगत हिता प्रश्न विचारणारी पात्रे आहेत त्यांच्या संवादातून विवेकवादी आणि परिवर्तन मधील विचार पुढे येतात .

नाटकाचा आशय :-

शोभायात्रा हे शपथ खाण्याचं सामाजिक असल्याचं मार्बल आहे. या नाटकातून समाजातील धार्मिकता अंधश्रद्धा जातीयता राजकीय स्वार्थ सामाजिक संघर्ष आणि माणुसकी यांचे वास्तव चित्रण केलं आहे धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने समाजामध्ये निर्माण होणाऱ्या विविध समस्या नाटक करणे प्रभावीपणे मांडलेले आहेत यामध्ये धार्मिक उत्सवाचे स्वरूप यामध्ये धार्मिक उत्सवात समाजाने एकत्र आणण्यासाठी असतो परंतु त्याचं रूपांतर अधिक खवा स्पर्धा प्रतिष्ठेच्या प्रदर्शन त्यातून सामाजिक तरुण निर्माण होतो हे नाटकातून स्पष्ट होते धार्मिक आणि जातीय संघर्ष समाजातील विविध धर्माजातीमध्ये गैरसमज निर्माण करून तणाव आणि संघर्ष वाढवणाऱ्या प्रवृत्तीचे नाटककाराने चित्रण केला आहे.

नाटकातील महत्त्वाच्या प्रसंगातून संघर्षांचे विश्लेषण :-

नाटकाच्या कथानकात स्वातंत्र्य दिनानिमित्त स्वातंत्र्य लढ्यातील नेत्याच्या वेशभूषित शुभयात्रेत सहभागी होणारी काही प्रतिष्ठित मंडळी एका ठिकाणी जमलेली असतात मात्र त्यांचे वैयक्तिक जीवन आणि ते साकारत असलेल्या राष्ट्रीय नेत्यांची तत्वे यात मोठी तफावत दिसते. राष्ट्रपुरुषांची तत्वे आणि पात्रांचे प्रत्यक्ष जीवन :-गांधीजी नेहरू लोकमान्य टिळक आणि इतर स्वातंत्र्यवीरांच्या भूमिका करणारी पात्रे त्यांच्या आदर्शांचे संवाद बोलतात परंतु त्यांच्या स्वतःच्या जीवनात स्वार्थ तडजोड आणि नैतिक विसंगती आढळतात त्यामुळे आदर्श आणि वास्तव्य यांच्यातील संघर्ष स्पष्ट होतो.

राजकीय सत्ता आणि नैतिक मूल्यांचा संघर्ष :-शोभा यात्रेचे आयोजन करणाऱ्या बाईच्या प्रभावामुळे पात्रे त्याच्या दबावाखाली वागतात त्याच्या मदतीचा किंवा आश्रयाचा फायदा घेतलेली मंडळी त्याला विरोध करण्यास कचरतात यातून सत्तेचा प्रभाव स्वार्थ आणि नैतिक मूल्यांमधील संघर्ष दिसतो.

स्त्री स्वातंत्र्य आणि वास्तवातली असा हयता :-झाशीच्या राणीची भूमिका करणारी शिक्षिका धैर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या ऐतिहासिक व्यक्तिरेखाच संवाद बोलते परंतु स्वतःचे वैवाहिक

जीवनातील अडचणींचा सामना करावा लागतो याचा विरोधाभास यातून स्त्रीच्या आदर्श प्रतिमेचा आणि प्रत्यक्ष परिस्थितीचा संघर्ष दिसतो .

स्वातंत्र्याचे आदर्श आणि सामान्य माणसाचे जीवन :-नाटकातील चहावाल्या मुलाची व्यक्तिरेखा विशेष महत्त्वाची आहे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील महान नेत्यांची माहिती नसलेल्या या मुलासमोर शिक्षण आणि सुरक्षित भविष्य यासारखे प्रश्न आहेत त्याच्या परिस्थितीतून स्वातंत्र्याच्या आदर्श बरोबरच सामान्य माणसाच्या जीवनातील वास्तव समोर येते वरील प्रसंगातून नाटककाराने आदर्श आणि वास्तव सत्ता आणि नैतिकता तसेच देशभक्ती आणि सामान्य माणसाच्या जीवनातील प्रश्न यामधील संघर्ष प्रभावीपणे मांडला आहे.

संघर्षाचे महत्व :-नाटकातील सामाजिक वास्तव समजून घेण्यास मदत होते.

मानवी स्वभावातील विरोधाभा स्पष्ट होतात.

समाजातील रूढी प्रतिष्ठा आणि मूल्य व्यवस्थेचा विचार करण्यास प्रवृत्त करते.

प्रेक्षकांना स्वतःच्या विचारांचा परीक्षण करण्याचे संधी मिळते.

नाटकातील नाट्यमयता आणि वैचारिक खोली प्राप्त होते.

संभाव्य प्रश्न :-

१ . नाटक म्हणजे काय हे सांगून नाटकाची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करा .

२ .नाटकाचे वेगळेपण स्पष्ट करा .

3 . नाटकाचे प्रमुख प्रकार स्पष्ट करा .

नमूना उत्तर :-

नाटक म्हणजे काय हे सांगून नाटकाची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करा? .

उत्तर :- नाटकाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी, आपल्याला नाटकाच्या विविध पैलूंचा विचार करावा लागेल.

नाटकाची व्याख्या:

नाटक हे एक कला माध्यम आहे. ज्यात कथा, संवाद, पात्र आणि अभिनय यांचा समावेश असतो. हे माध्यम रंगमंचावर सादर केले जाते. नाटक हे दृक्-श्राव्य (Audio-Visual) माध्यम आहे.

नाटकाचे घटक:

1) कथा (Plot): नाटकाची कथा ही घटना आणि पात्रांच्या माध्यमातून सादर केली जाते.
2) पात्र (Characters): नाटक हे पात्रांशिवाय अपूर्ण आहे. पात्रांच्या माध्यमातून कथेला पुढे नेले जाते.
3) संवाद (Dialogue): पात्रांमधील संवाद नाटकाचा महत्त्वाचा भाग असतो.
4) अभिनय (Acting): पात्रांना न्याय देण्याचे काम अभिनेत्यांकडून केले जाते.
5) दिग्दर्शन (Direction): दिग्दर्शक नाटकाला योग्य दिशा देतो.
6) संगीत (Music): नाटकामध्ये संगीत नाटकाला अधिक आकर्षक बनवते.
7) प्रकाश योजना (Lighting): नाटकातील प्रकाश योजना नाटकाला एक वेगळी उंची देते.